**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ०५/२०१८-१९/ 149    दिनांक: ०४.०७.२०१८ 04/07/2018

**आदेश**

**आदेश केस क्र. ०५/२०१८-२०१९(२८.०६.२०१८)**

| | | |
|---|---|---|
| | श्री नितीन रामाजी मोता<br>"गुरुकृपा " परांजपे कॉलनी पत्रकारनगर<br>जवळ सांगली | **अर्जदार** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली | **पक्षकार** |
| २) | कार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>शहर विभाग सांगली | |
| ३) | उपकार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग उत्तर सांगली | |

**कोरमः**-१.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष
२.श्री. पी.व्ही.. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. पुजारी, ग्राहक सदस्य,

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार.

**न्यायनिर्णय**

28/6/2018

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

श्री नितीन दामाजी मोता, सांगली, यांनी अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण मंच, सांगली यांच्या निकालाने व्यथीत होऊन या मंचाकडे दिनांक २६.०४.२०१८प्रस्तुत तक्रार दाखल केली आहे.

श्री स्वानंद माधव परांजपे यांनी मूळ ग्राहक श्री नितीन दामाजी मोता, ग्राहक क्र. २७९९४०७०८१७१ यांचे नांवे असलेल्या विद्युत देयकाची आकारणी जास्त येत असलेची तक्रार दाखल केलेली होती. सदर ग्राहकाने दिनांक २८-०७-२०१७ रोजी सदर विद्युत कनेक्शनशी संबंधीत उत्तर उपविभाग सांगली(शहर) येथे वीज बिल दुरुस्तीबाबत अर्ज दाखल केलेला होता. सदर अर्जामध्ये ग्राहकाने लाईट बिल काही महिन्यापासून जास्त येत असून ते दुरुस्त करुन देण्याची विनंती केली होती. तसेच दिनांक २६.०८.२०१७ रोजी ग्राहकाने समांतर मीटर बसवून मीटर तपासणी करुन मिळणेबाबत कळविले.

ग्राहकाकडून मीटर तपासणीचे पैसे भरुन घेऊन. सदर मीटर टेस्टींगला विभागीय कार्यालयास पाठविण्यात आला. ग्राहकाचा मीटर तपासणी अहवाल पत्र क्र. EE/SGL/U/१७१७ दिनांक २८.११.२०१७ नुसार सदरचे मीटर १०० टक्के सदोष असलेचा अहवाल प्राप्त झाला. त्या अनुषंगाने महाराष्ट्र विद्युत नियामक अयोग मधील (विद्युत पुरवठासंहिताआणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम २००५ मधील कलम क्र.१५.४.१ मध्ये नमूद केलेल्या तरतूदीनुसार आपणास माहे मे-२०१७ पासून जानेवारी २०१८ पर्यन्तचे विद्युत देयक १७१ युनिट प्रतिमाह नुसार दुरुस्त करुन देण्यात आले आहे. सदर विद्युत देयक दुरुस्त करताना महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या निर्देशानुसार "मीटर सदोष असल्याचे ज्या महिन्यात निदर्शणास आले असेल त्या महिन्याच्या मागील जास्तीत जास्त तीन महिन्याच्या कालावधीतील ग्राहकाच्या देयकाची रक्कम समायोजित करण्यात येते" तदनुसार ग्राहकाच्या दिनांक २८-०७-२०१७ च्या प्राप्त लेखी तक्रारीपूर्वी तयार झालेली तीन विद्युत देयके म्हणजेच माहे मे-२०१७ व जुलै-२०१७ (वीज बिल तयार झालेला दिनांक २०.०७.२०१७ ) ही विद्युत देयके तसेच त्या पुढील माहे जानेवारी-२०१८ पर्यन्तची विद्युत देयके दुरुस्ती करुन देण्यात आलेली आहेत.

प्रस्तुत प्रकरणाची सुनावणी दिनांक २८.०६.२०१८ घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी तक्रारदारातर्फे स्वानंद माधव परांजपे, तर वि.प. कंपनीतर्फे उपव्यवस्थापक(विवले) श्री संजय नरके, हजर होते. उभतांनी आपआपल्या पक्षकथनारुप आपला युक्तिवाद सादर केला.

आपल्या निष्कर्षाकरता खालील मुद्दे उपस्थित होतात.

१) तक्रारदारास जानेवारी २०१७ पासून मिटर १००टक्के सदोष या कलमा खाली दिनांक २८.०७.२०१७ पासून वीज बिल दुरुस्त करुन मिळण्याचा अधिकार आहे काय ?

उत्तर:-नाही

२) तक्रारदाराची तक्रार मंजूर होण्यास पात्र आहे काय?

उत्तर:- नाही

३) अंतिम आदेश?

उत्तर:- खालील प्रमाणे

आमच्या वरील निष्कर्षाची कारणे खालील प्रमाणे आहेत.

**कारणे**

**मुद्दा क्र. १ ते ३**:- प्रस्तुत प्रकरणातील सर्व तथ्य (Facts) उभय पक्षी मान्य आहेत. ही बाब उभयपक्षी मान्य आहे की, तक्रारदाराने दिनांक २८.०७.२०१७ रोजी वीज देयकाची आकारणी जास्त येत असल्याची तक्रार उत्तर उपविभाग सांगली (शहर) येथे दाखल करुन विजबिल दुरुस्ती बाबतचा अर्ज दाखल केलेला होता. हे देखिल उभयपक्षी मान्य आहे की, दिनांक २६.०८.२०१७ रोजी तक्रारदाराने समांतर मिटर बसवून त्याच्या मिटरची तपासणी करुन द्यावी अशी मागणी केलेली होती. ही बाब देखिल उभयपक्षी मान्य आहे की, तक्रारदाराकडून मीटर तपासणीचे पैसे भरुन घेऊन त्याचा मिटर टेस्टीग विभागकडे तपासणी करता पाठविला असता तपासणी अहवाल दिनांक २८.११.२०१७ ने सदरचे मिटर १०० टक्के सदोष असल्याचा अहवाल आला, व त्यानंतर तक्रारारास माहे मे-२०१७ पासून जानेवारी-२०१८ पर्यन्तचे विद्युत बिल सरासरी १७१ यूनिट प्रतिमाह प्रमाणे दुरुस्त करुन देण्यात आलेले आहे. तक्रारदाराचा त्यावरील आक्षेप असा आहे की, सदरचे मिटर हे ब-याच काळापासून सदोष आहे. त्यामुळे निदान त्याने विज बिलाबाबत जो तक्रार अर्ज दिनांक २८.०७.२०१७ रोजी दिला होता, त्या तारखेपासून तरी त्याच्या विज बिलामध्ये दुरुस्ती व्हावयास हवी.

तक्रारदारातर्फे स्वानंद परांपजे यांनी वरील बाबीवर आपल्या युक्तीवादात जास्ती भर दिला. तथापि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता व पुरवठयाच्या इतर अटी ) विनियम २००५ मधील कलम १५.४.१ मधील तरतूदीनुसार ज्यावेळेला ग्राहकाचे मिटर सदोष असल्याचे आढळून येते त्यावेळेला, ज्या महिन्यात विद्युत बिलाबाबत वाद निर्माण होतो, त्या महिन्याच्या अगोदरच्या तीन महिन्याचेच केवळ बिल समायोजित (Adjust) करुन देण्याचे प्रावधान आहे. त्या कलमात नमूद केलेल्या कालावधीपेक्षा जास्त कालावधीचे विद्युत बिल समायोजित करण्याची तरतूद त्या कलमात नाही. त्या कलमाचे स्वरुप mandatory असून त्यात फेरबदल करण्याचा कोणताही स्वेंच्छाधिकार (Discretion) कोणालाही दिलेला नाही. कायद्याच्या प्रावधानाचे तंतोतंत पालन करण्याचे बंधन ग्राहकांसकट, सर्वांवरच आहे. त्यामुळे तक्रारदारांची विनंती मान्य करता येत नाही. आणि त्याच कारणाकरिता तक्रारदाराचे प्रतिनिधी श्री परांजपे यांचा युक्तिवाद मान्य करता येत नाही. कायद्यांच्या वर नमूद केलेल्या ठाम पस्थितीमुळे वर नमूद केलेले मुद्दे क्र.१ व २ यांचे उत्तर नकारार्थी द्यावे लागेल त्यामुळे आम्ही त्यांचे उत्तर नकारार्थी दिलेले आहे.

वर नमूद केलेल्या कारणास्तव व आमच्या निष्कर्षामुळे प्रस्तुतची तक्रार नामंजूर करावी लागेल असा या मंचाचा निष्कर्ष आहे. सबब आम्ही खालील आदेश पारित करीत आहोत.

28/6/2018

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

**आदेश**

१) प्रस्तुतची तक्रार ना मंजूर करण्यात येत आहे.
२) तक्रारदारास महाराष्ट्र विज नियामक अयोग (Electrcity supply code and other condition of supply) विनियम २००५ च्या कलम १४.४.४ नुसार तक्रारदाराने भरलेली मिटर तपासणी फी त्याच्या पुढील विज बिलातून सूट देऊन परत करावी.
२) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

28/6/18      28/6/2018

| | | |
|---|---|---|
| ( पी.एस. पुजारी) | (पी. व्ही. खपली) | (ए.व्ही. देशपांडे) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण